नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS


वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ११७ Issue - 117 | वार - सोमवार दि. २१ सप्टेंबर २०२६ Blow- Monday Date 21 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# परतीचा पाऊस देशभर धुमाकूळ घालणार; १३ राज्यांना अलर्ट

## वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस कोसळणार; वाऱ्याचा वेग ७० ते ८० कि.मी. असणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारली आहे. पाऊस जणू काही राज्यावर रुसून बसला आहे. पाऊस पडत नसल्याने राज्यातील शेतकरी चिंतेत आहेत. सप्टेंबर महिन्याची २० तारीख उजाडली तरी पाऊस न पडल्याने दुष्काळाचे भयावह संकट शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर उभे राहताना दिसत आहे. अशा या परिस्थितीत हवामान तज्ज्ञ यांनी शेतकऱ्यांना आशेचा किरण ठरेल असा हवामान अंदाज वर्तवला आहे. देशभरातील १३ राज्यांत मुसळधार पाऊस पडणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यंदा ज्या भागांमध्ये जास्त पाऊस पडला नाही तिथे आता मोठा पाऊस पडणार असल्याचा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे. राज्यात कोकोणत्या जिल्ह्यांमध्ये पाऊस पडेल, याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली आहे.





२० तारखेपासून राज्यातला पावसाचा जोर वाढणार आहे. २० ते २४ सप्टेंबरपर्यंत पाऊस पडणार आहे. पुढच्या चार दिवसांत दक्षिण महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भात चांगल्या पावसाची शक्यता आहे. यामध्ये नांदेड, यवतमाळ, हिंगोली, अकोला, अमरावती, बुलढाणा, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, लातूर, बीड, परभणी, जालना, धाराशिव, सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर आणि कोकण पट्ट्यामधील जिल्ह्यांमध्ये चांगल्या पावसाची शक्यता आहे. या पावसामुळे ओढे-नाले भरुन वाहणार आहेत, असा दावा पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.

उत्तर महाराष्ट्रात नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव, संगमनेर या जिल्ह्यांमध्ये भाग बदलून विखुरलेल्या स्वरुपाचा पाऊस २० तारखेला पडेल. त्यानंतर २१ ते २४ तारखेच्या दरम्यान दमदार पावसाची शक्यता आहे, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.

पश्चिम महाराष्ट्र, दक्षिण महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टी या भागांमध्ये चांगल्या पावसाची शक्यता आहे. पुढच्या चार दिवसांत कोकण किनारपट्टी भागात मुसळधार पावसाची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि दक्षिण महाराष्ट्राबाबत बोलायचं झालं तर सांगली, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, अहिल्यानगर, धाराशिव, लातूर, बीड, आष्टी, कर्जत, जामखेड, परभणी, गेवराई, नांदेड, हिंगोली, वाशिम, छत्रपती संभाजीनगर, यवतमाळ या भागांमध्ये २४ तारखेपर्यंत चांगल्या जोराचा पाऊस पडणार आहे.

दक्षिण महाराष्ट्रात सोलापूर, धाराशिव आणि बीड, आष्टी, कर्जत, जामखेड, पाथर्डी, श्रीगोंदा, पाटस, बारामती या भागांमध्ये पाऊस पडलेला नाही. पण पंजाबराव डख यांनी वर्तवलेल्या अंदाजानुसार, २४ तारखेपर्यंत या भागांमध्ये पाऊस पडणार आहे. सोलापूर जिल्ह्यात मंगळवेढा, पंढरपूर, जत, आटपाडी, सांगोला या परिसरात चांगला पाऊस असणार आहे. तसेच तुळजापूर, नळदुर्ग या परिसरात देखील चांगला पाऊस असणार आहे.

मुंबईतही चांगल्या पावसाची शक्यता आहे. पावसाळ्यातली सर्वात मोठा पाऊस असणार आहे. शेतीला जीवनदान असा हा पाऊस असणार आहे. विदर्भात रात्रीच्या वेळीला विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता आहे, असं पंजाबराव डख यांनी सांगितलं.

सांगली, कोल्हापूर, सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, बीड, लातूर, धाराशिव, परभणी, नांदेड, जालना, वाशिम, हिंगोली, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये २० ते २३ सप्टेंबर चांगला पाऊस पडेल. अचानक वातावरणात बदल होईल आणि चांगला पाऊस पडेल, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.

# परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, सीबीआय संचालक ते माजी लष्करप्रमुखांना सुद्धा निवडणूक आयोगाची नोटीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आणि त्यांच्या पत्नी क्योको एस. जयशंकर यांना निवडणूक आयोगाकडून एसआयआर अंतर्गत नोटीस पाठवण्यात आली आहे. यामध्ये सीबीआय संचालक प्रवीण सूद आणि त्यांचे कुटुंब, माजी लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आणि त्यांच्या पत्नी, तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या माजी न्यायमूर्ती रंजना देसाई आणि त्यांच्या कुटुंबाचाही समावेश आहे. निवडणूक आयोगाने जारी केलेल्या नोटिसांमध्ये अनेक विद्यमान आणि निवृत्त वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. त्यांच्या नोंदींमध्ये विसंगती आढळली होती. मागील मतदार यादीच्या सुधारणेदरम्यान तयार केलेल्या यादीशी निवडणूक आयोगाला त्यांची सद्य माहिती जुळवता आली नाही. या नोटिसांविषयी व्यक्त झालेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर, दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, नोटीस मिळाल्याचा अर्थ असा नाही की संबंधित व्यक्तींची नावे मतदार यादीतून काढून टाकली जातील.

मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले की, वरील प्रवर्गातील व्यक्तींना एउखछएढ मधील त्यांची माहिती दुरुस्त करण्यासाठी प्रणालीद्वारे तयार केलेल्या नोटिसा पाठवल्या जात आहेत. कोणालाही आपली बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय आणि वैध, ठोस व अपील करण्यायोग्य आदेशाशिवाय कोणाचेही नाव काढले जाऊ शकत नाही.

एस. जयशंकर आणि त्यांच्या पत्नीला 'अनमॅप्ड लास्ट एसआयआर' (णपार्रशिव डरीीं डखठ) श्रेणीत ठेवण्यात आले आहे. याचा अर्थ असा की, २००२ मध्ये शेवटच्या सुधारणेदरम्यान तयार केलेल्या यादीत त्यांच्या सध्याच्या मतदार नोंदींचा समावेश करता आला नाही. ते नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघातील सुंदर बाग मतदारसंघात मतदार म्हणून नोंदणीकृत आहेत. सीबीआय संचालक प्रवीण सूद, त्यांच्या पत्नी वनिता सूद आणि त्यांच्या आई कमलेश सूद यांचाही या श्रेणीत समावेश आहे. या यादीत माजी लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आणि त्यांच्या पत्नी सुनीता द्विवेदी यांचाही समावेश आहे, जे नवी दिल्ली विधानसभा मतदारसंघात नोंदणीकृत मतदार आहेत. या संपूर्ण प्रकरणावर, निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे की, मतदारांनी बीएलओंना गणना अर्जांमध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे मतदार यादीचा मसुदा तयार करण्यात आला होता. मतदार यादीचा मसुदा ३१ ऑगस्ट, २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आला. ही यादी दिल्लीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या वेबसाइटवर, संबंधित विधानसभा मतदारसंघांच्या एठज/एठज कार्यालयांमध्ये आणि सर्व नियुक्त ठिकाणी उपलब्ध आहे. सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, नोटिसा बजावल्याचा अर्थ असा नाही की त्यांची नावे दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्राच्या मतदार यादीतून काढून टाकली जातील. एउखछएढ मधील त्यांची माहिती दुरुस्त करण्यासाठी उपरोक्त नमूद केलेल्या प्रवर्गातील लोकांना प्रणालीद्वारे तयार केलेल्या नोटिसा पाठवल्या जात आहेत. कोणालाही त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय आणि योग्य कारणांसह अपील करण्यायोग्य आदेश दिल्याशिवाय कोणाचेही नाव काढले जाऊ शकत नाही. त्यामुळे, सामाजिक आणि छापील माध्यमांमध्ये जसे वृत्त दिले जात आहे, तसे कोणतेही अस्तित्वाचे संकट नाही.

# प्रियकराच्या त्रासाला कंटाळून २१ वर्षे तृतीयपंथीयांची सोलापुरात आत्महत्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : प्रियकराकडून होत असलेल्या मानसिक आणि शारीरिक तासाला कंटाळून एका २१ वर्षीय तृतीयपंथी आणि गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना सोलापुरात घडली. या घटनेमुळे शहरात आणि विशेषतः तृतीया पणती या समाजातील मोठी खळबळ उडाली आहे अभिजीत उर्फ कोमल हरिबा नाट्यक ( वय २१ राहणार कोळी वस्ती होटगी दक्षिण सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या तृतीयपंथीयांचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार कोमलचे एका तरुणांसोबत प्रेम संबंध होते. मात्र, या संबंधातून गेल्या काही काळापासून प्रियकराकडून तिचा मानसिक आणि शारीरिक छळ सुरू होता, असा आरोप कोमलच्या गुरूंनी केला आहे सततच्या या त्रासाला कंटाळून कोमलने साखर कारखाना परिसरातील स्मशानभूमीत लोखंडे मुन्नीच्या साह्याने गळफास लावून आपले जीवन संपवले.



घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली या प्रकरणाची नोंद सिविल पोलीस चौकीत करण्यात आले असून पुढील तपास पोलीस करीत आहे.

दरम्यान या घटनेची वृत्त समजताच सोलापूर सिव्हिल हॉस्पिटल परिसरात तृतीयपंथीय समाजातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती या दुर्दैवी घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात असून संबंधित आरोपी प्रियकरांची कसून चौकशी करून त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी तृतीयपंथीय समाजाकडून होत आहे पोलीस तपासानंतर या घटनेमागील सर्व सत्य समोर येईल.

# दुष्काळ जाहीर करा, विकासकामे थांबवा, संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना जगवण्यासाठी खर्च करा; रोहित पवारांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : सध्या राज्यातील बहुतांश भागात पावसानं हजेरी लावलेली दिसत नाही. त्यामुळं शेतकऱ्यांची पिकं वाया गेली आहे. अनेक ठिकाणी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे मराठवाडा पाहणी दौऱ्यावर आहेत. यावेळी ते बांधावर जाऊन थेट पिकांची पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेत. शक्तीपीठ महामार्गासारख्या विकास कामांचा निधी दुष्काळग्रस्तांकडे वळवावा आणि तात्काळ मदत जाहीर करावी अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केलीय. खरिपात ७५ टक्क्यांहून अधिक नुकसान झालं आहे. रब्बीचीही आशा मावळली आहे. पुढील दहा महिने शेतकऱ्यांना जगवण्याचे आव्हान असल्याचे पवार म्हणाले.

खरिपात ७५ टक्क्यांहून अधिक नुकसान झाले आहे. त्यामुळे रब्बी हंगामाचीही आशा संपली असून, जनावरांच्या चाऱ्यासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पुढील दहा महिने सर्वसामान्य शेतकऱ्यांना कसे जगवायचे, हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे सरकारने तात्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांनी केली आहे. रोहित पवार हे मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी दौऱ्यावर आहेत. धाराशिव आणि बीड जिल्ह्यांतील पाहणीनंतर ते लातूर जिल्ह्यातील किनगाव येथे दाखल झाले. यावेळी किनगावमधील शेतकऱ्यांनी रोहित पवार यांच्यासमोर आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. प्रशासनाकडून पंचनामे आणि मदत मिळत नसल्याबद्दल शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.



शक्तीपीठ महामार्गासारखी विकासकामे थांबवून त्यासाठीचा पैसा सध्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना जगवण्यासाठी खर्च करावा, अशी मागणीही रोहित पवार यांनी केली. तात्काळ दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना मदत द्यावी, अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे. दरम्यान, सरकारनं दुष्काळ जाहीर करावा, याबाबत शरद पवार यांनी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहलं आहे.

## पेट्रोल पंपांच्या युपीआय शुल्क विरोधावर फडणवीसांचा पलटवार

## यूपीआय आणि डिजिटल व्यवहारांमुळे देशातील व्यवहार अधिक सुलभ

# ‘यूपीआयमुळे व्यवसाय वाढला, नाममात्र शुल्कालाही विरोध नको’

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : मध्य प्रदेशातील पेट्रोल पंप चालकांनी दोन हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेचे यूपीआय व्यवहार स्वीकारणार नसल्याची भूमिका घेतल्याच्या पार्श्वभूमीवर सरकारकडून या भूमिकेला विरोध करण्यात आला आहे. यूपीआयमुळे पेट्रोल पंप चालकांचा व्यवसाय वाढला असून, मोठ्या प्रमाणात ग्राहक डिजिटल पेमेंटचा वापर करत आहे. त्यामुळे भविष्यात यूपीआय व्यवहारांवर नाममात्र शुल्क आकारण्याच्या प्रस्तावाला व्यापारी आणि पेट्रोल पंप चालकांनी विरोध करू नये, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून व्यक्त करण्यात आले.

यूपीआय आणि डिजिटल व्यवहारांमुळे देशातील व्यवहार अधिक सुलभ झाले असून, व्यापार वाढविण्यासोबतच भ्रष्टाचार कमी करण्यासही त्याचा मोठा फायदा झाला आहे. त्यामुळे डिजिटल पेमेंटची सुविधा कायम ठेवत त्याचा विस्तार करण्याची गरज आहे. यूपीआय व्यवहारांसाठी अतिशय नाममात्र शुल्क आकारण्याचा प्रस्ताव असल्याचे सरकारकडून सांगण्यात येत आहे. मात्र, या प्रस्तावाबाबत गैरसमज निर्माण केला जात आहे. यूपीआय व्यवहारांवर शुल्क आकारण्यासंदर्भात संसदीय समितीने यापूर्वी शिफारस केली होती, असा दावा करण्यात आला. या समितीत काँग्रेससह तत्कालीन यूपीएतील काही प्रमुख नेते सहभागी होते आणि माजी केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांचाही त्यात समावेश होता. त्यामुळे आता यूपीआय व्यवहारांवर शुल्क आकारण्याच्या प्रस्तावाला विरोध करताना या पूर्वीच्या शिफारसींचाही विचार करावा, असा युक्तिवाद मुख्यमंत्र्यांकडून करण्यात आला.



प्रस्तावित शुल्क सर्व व्यवहारांवर मोठ्या प्रमाणात लावले जाणार नसून काही विशिष्ट किंवा छोट्या व्यवहारांपुरतेच त्याचे स्वरूप असेल. त्यामुळे ग्राहक आणि व्यापाऱ्यांमध्ये अनावश्यक गैरसमज निर्माण करण्याऐवजी डिजिटल व्यवहारांच्या व्यापक फायद्यांचा विचार करण्याची गरज आहे. यूपीआयच्या माध्यमातून व्यवहार करण्याची सवय देशभरात मोठ्या प्रमाणात वाढली आहे. पेट्रोल पंपांवरही ग्राहकांकडून डिजिटल पेमेंटचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे यूपीआय सुविधा बंद करण्याऐवजी त्या माध्यमातून होणारे व्यवहार अधिक सुरक्षित आणि सुलभ करण्यावर भर देणे आवश्यक आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

दरम्यान, महाराष्ट्रात पायाभूत सुविधा आणि औद्योगिक विकासाच्या योजनांवरही सरकारकडून भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. समृद्धी महामार्गालगत मालवाहतुकीसाठी स्वतंत्र डेडिकेटेड फ्रेट रेल्वे मार्ग उभारण्याचा प्रस्ताव असून, महाराष्ट्र रेल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला त्याचा डीपीआर तयार करण्याचे काम देण्यात आले आहे. वाढवण आणि जवाहरलाल नेहरू पोर्टवरून नाशिक, जालना, सेलू, वर्धा आणि गडचिरोलीपर्यंत मालवाहतूक रेल्वे जोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच सावनेर परिसरात संरक्षण, न्यूक्लियर आणि एरोस्पेस क्षेत्रातील प्रकल्पांसाठी सुमारे पाच हजार एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागपूरच्या इंजिनिअरिंग महाविद्यालयांमध्ये कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून भरती सुरू असून, उच्च पगाराच्या रोजगाराच्या संधी निर्माण होत आहे. त्याव्यतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक परिसरात चार कंपन्या सुरू झाल्या असून, देशातील मोठ्या सोलर मॉड्यूल उत्पादक कंपन्यांपैकी एक कंपनी तेथे कार्यरत असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दरम्यान, काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या इंदौर येथील कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मिमिक्री करण्यात आल्याच्या मुद्द्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी आणि काँग्रेसवर निशाणा साधला. ते म्हणाले की, राहुल गांधींना एवढेच काम उरले आहे की, कोणाच्या नकला करायच्या. त्यामुळे त्यांनी स्टँड-अप कॉमेडीमध्ये काम केले पाहिजे. त्यामुळे त्यांना रोजगार तरी मिळेल, कारण त्यांच्या पार्टीलाच आता कुठले काम उरलेले नाही, अशी टीका मुख्यमंत्री यांनी केली.

## संपादकीय....

# निर्यातीत वाढ

भारताचे अमेरिकेसोबत असलेले व्यावसायिक संबंध सध्या तणावात आहेत. अशात भारताचे इठखउड राष्ट्र समूहातील देशांसोबत असणारे व्यावसायिक संबंध आणखीन घट्ट होत आहेत. या राष्ट्र समूहातील इतर चार प्रमुख देश चीन, रशिया, ब्राजील आणि दक्षिण आफ्रिका या देशांमध्ये भारताची निर्यात वाढली आहे. गेल्या पाच महिन्यांमध्ये ब्रिक्स प्रमुख राष्ट्रांसोबतच्या भारताच्या निर्यातीत ३४ टक्क्यांची वाढ झाली आहे. एप्रिल ते ऑगस्ट २०२६ या पाच महिन्यांच्या काळात भारताने ब्रिक्स राष्ट्रांमध्ये सुमारे १९.९ अब्ज डॉलरची निर्यात केली होती. गेल्या वर्षीच्या याच काळातील हा आकडा १४.९ अब्ज डॉलर होता. एकंदरीत वर्षभरात निर्यातीत ५ अब्ज डॉलरने वाढ झाली आहे. ब्रिक्स राष्ट्र समूहातील चीन भारताचा प्रमुख ग्राहक आहे. एप्रिल-ऑगस्ट २०२६-२७ या काळात चीनला होणाऱ्या भारताच्या निर्यातीत सुमारे ३९ टक्क्यांची वाढ जहजली आहे. गेल्या पाच महिन्यांत भारताने चीनला सुमारे ९.६ अब्ज कोटींची निर्यात केली आहे. महत्वाचे म्हणजे ब्रिक्स समूहातील सगळ्या प्रमुख राष्ट्रांना झालेल्या निर्यातीतील जवळपास अर्धा वाटा हा एकट्या चीनचा आहे. दक्षिण आफ्रिका हा देश ब्रिक्स राष्ट्र समूहातील प्रमुख राष्ट्रांपैकी एक आहे. जिथे गेल्या पाच महिन्यांत चीनमध्ये भारताची निर्यात ३९ टक्क्यांनी वाढली आहे तिथे दक्षिण आफ्रिकेने चक्क आभाळ गाठले आहे. गेल्या पाच महिन्यातील भारताच्या निर्यातीचा दर पाहता दक्षिण आफ्रिकेत भारताची निर्यात तब्बल ५८ टक्क्यांनी वाढली आहे. हा वेग ब्रिक्स समूहातील इतर राष्ट्रांपेक्षा सर्वाधिक आहे. ब्रिक्स समूहातील चीन गेल्या पाच महिन्यांत ९.६ अब्ज कोटींच्या निर्यातीने भारताचा सगळ्यात मोठा ग्राहक राहिला आहे. तर दक्षिण आफ्रिकेत ५८ टक्क्यांनी झालेली निर्यात वाढ समूहातील इतर राष्ट्रांच्या तुलनेने सर्वाधिक आहे. गेल्या पाच महिन्यांत ब्राजीलमध्ये होणाऱ्या भारताच्या निर्यातीत १३ टक्क्यांची वाढ झाली आहे.

# विश्व शांती : हिंसाचार युद्ध आणि धास्तीच्या अभावाचे जग

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

(२१सप्टेंबर: आंतरराष्ट्रीय शांतता दिन)

आंतरराष्ट्रीय शांतता दिन हा दरवर्षी २१ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. हा दिवस जगभरातील शांतता, अहिंसा आणि एकात्मतेसाठी समर्पित आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने १९८१ साली हा दिवस शांततेच्या महत्त्वावर जागतिक पातळीवर लक्ष केंद्रित करण्यासाठी स्थापन केला होता. युद्ध, संघर्ष आणि हिंसेच्या पार्श्वभूमीवर, या दिवशी लोक एकत्र येऊन शांततेच्या विचारांचे समर्थन करतात.

शांततेचा प्रसार, संवाद आणि समन्वय वाढवण्याचे महत्त्व पटवून देण्याच्या उद्दिष्टाने विविध उपक्रम, चर्चासत्रे आणि कार्यक्रम योजले जातात. या दिवसाचे एक मुख्य उद्दिष्ट म्हणजे मानवजातीने एकमेकांशी संवाद साधून आणि मतभेद सोडवून शांततेच्या दिशेने पावले उचलणे. विश्वशांती दिवसाच्या निमित्ताने लोक एकत्र येऊन समाजातील हिंसेचे निर्मूलन कसे करता येईल, यावर चर्चा करतात आणि शांततेच्या दिशेने कार्य करण्याची प्रतिज्ञा घेतात. विश्वव्यापी संत निरंकारी मिशन ही जागतिक पातळीवर विश्वशांती, मानवता आणि सार्वत्रिक बंधुभाव (Universal Brotherhood) वाढवण्यासाठी कार्य करणारी एक महत्त्वाची आध्यात्मिक संस्था आहे. या मिशनचे मुख्य ध्येय ''निराकार-परमेश्वराची ओळख करून देऊन मानवी मनात शांतता निर्माण करणे हे आहे, कारण मिशनचे मानणे आहे की भिंती विरहित जग- World without walls केवळ आध्यात्मिक जागृतीतूनच शक्य आहे.

वश्वशांती (जागतिक शांतता) म्हणजे पृथ्वीवरील सर्व राष्ट्रे, समाज आणि मानवांमध्ये हिंसाचार, युद्ध आणि भीतीचा अभाव असणारी एक आदर्श स्थिती होय. ज्या ठिकाणी शांतता असते, तिथेच बंधुभाव, विकास आणि मानवी कल्याण शक्य होते. विश्वशांती संकल्पनेची सविस्तर माहिती खालील मुद्द्यांच्या आधारे समजून घेऊया: १. आंतरराष्ट्रीय शांतता दिन (International Day of Peace) जागतिक स्तरावर शांततेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेद्वारे (UN) दरवर्षी २१ सप्टेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय शांतता दिन म्हणून साजरा केला जातो. २. इतिहास: या दिवसाची सुरुवात सन १९८१ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या ठरावाने झाली. सन १९८२ पासून हा दिवस अधिकृतपणे साजरा करण्यास सुरुवात झाली. ३.उद्देश: जगातील सर्व देशांमधील संघर्ष संपवणे, युद्धविराम पाळणे आणि अहिंसेचा प्रसार करणे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. ४.भारताचे योगदान आणि 'पंचशील' तत्त्वेविश्वशांतीच्या बाबतीत भारताचा इतिहास नेहमीच मार्गदर्शकाचा राहिला आहे. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी जागतिक शांततेसाठी ''पंचशील'' (५ मूलभूत तत्त्वे) मांडली होती: एकमेकांच्या प्रादेशिक अखंडतेचा आणि सार्वभौमत्वाचा आदर करणे. ॰ एकमेकांवर आक्रमण न करणे. ॰ एकमेकांच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप न करणे. ॰ समता आणि परस्परांचा लाभ लक्षात घेणे. ॰ शांततापूर्ण सहअस्तित्व राखणे. ॰ विश्वशांतीची आवश्यकता का आहे? मानवी कल्याण: युद्ध आणि हिंसाचारामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी होते. शांततेमुळेच नागरिकांना सुरक्षित जीवन जगता येते. ॰ आर्थिक आणि सामाजिक विकास: ज्या देशांमध्ये शांतता असते, तिथे शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांचा विकास वेगाने होतो. ॰ अण्वस्त्र नियंत्रण: आजच्या काळात अनेक देशांकडे विनाशकारी अण्वस्त्रे आहेत. जागतिक शांतता टिकवून ठेवण्यासाठी अण्वस्त्रांचे नि:शस्त्रीकरण आवश्यक आहे. ॰ विश्वशांती समोरील मुख्य आव्हाने- १ दहशतवाद: आज आशिया खंडासह संपूर्ण जगाला दहशतवादाने ग्रासले आहे. २ साम्राज्यवाद आणि सीमावाद: देशादेशांमधील सीमरेषेवरून होणारे वाद (उदा. रशिया-युक्रेन किंवा इस्रायल-गाझा संघर्ष) हे जागतिक शांततेला मोठा धोका निर्माण करतात. ३ वांशिक आणि धार्मिक द्वेष: समाजातील अंतर्गत कलह आणि असहिष्णुता यामुळेही शांतता धोक्यात येते. ॰ महाराष्ट्रातील विश्वशांतीची प्रमुख प्रतीके- १) विश्वशांती स्तूप (वर्धा): महाराष्ट्रातील वर्धा जवळील गोपुरी येथे पांढऱ्या रंगाचे भव्य 'विश्वशांती स्तूप' आहे. फुजी गुरुजी आणि महात्मा गांधी यांच्या संकल्पनेतून हे स्तूप उभारले गेले असून ते जागतिक शांततेचे एक प्रमुख केंद्र मानले जाते. २) विश्वशांती घुमट (पुणे): पुणे येथील लोणी काळभोर येथे प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून जगातील सर्वात मोठा विश्वशांती घुमट (World Peace Dome) उभारण्यात आला आहे, जो विज्ञान आणि अध्यात्माच्या समन्वयातून शांततेचा संदेश देतो. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!!! आंतरराष्ट्रीय शांतता दिनाच्या सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!!

**– संत चरणरज –**
**श्रीकृष्णदास (बापू) निरंकारी.**
**राह. श्रीगुरूदेव हरदेवकृपा निवास.**
**पॉवर हाऊसच्या मागे, एकता चौक, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष– ९६९९८३६७१७.**

# मध्य रेल्वेची धडक कारवाई! १८.०३ लाख विनातिकीट प्रवाशांकडून १४० कोटींहून अधिकचा दंड वसूल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रेल्वे प्रवाशांना सुरक्षित, सुलभ आणि सन्मानजनक प्रवासाची खात्री करून देण्यासाठी मध्य रेल्वेने विनातिकीट आणि अनधिकृत प्रवासाविरुद्धची मोहीम अधिक तीव्र केली आहे. किमान दंडाच्या रकमेत झालेली वाढ आणि सखोल तपासणी मोहिमांमुळे चालू आर्थिक वर्षात मध्य रेल्वेने दंडात्मक वसुलीत विक्रमी कामगिरी नोंदवली आहे. एप्रिल ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत मध्य रेल्वेने तब्बल १८.०३ लाख विनातिकीट प्रवाशांवर कारवाई करत १४०.८१ कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत उत्पन्नात मोठी वाढ

मध्य रेल्वेच्या समर्पित तिकीट तपासणी पथकांनी ही कारवाई केली आहे. गेल्या वर्षी (एप्रिल ते ऑगस्ट २०२५) याच कालावधीत १७.१९ लाख प्रकरणांतून १००.५० कोटी रुपयांचा दंड वसूल करण्यात आला होता. यावर्षी प्रकरणांच्या संख्येत सुमारे ५% वाढ झाली असून, दंड वसुलीच्या उत्पन्नात तब्बल ४०% पेक्षा जास्त मोठी वाढ नोंदवली गेली आहे. या आकडेवारीनुसार, मध्य रेल्वेतर्फे दररोज सरासरी ११,००० पेक्षा अधिक जणांवर दंडात्मक कारवाई करून सुमारे ९२.०३ लाख रुपयांची वसुली केली जात आहे.



विभागनिहाय दंड वसुली (एप्रिल ते ऑगस्ट २०२६):

मुंबई विभाग: ८.८० लाख प्रकरणे – ५८.४६ कोटी रुपये

भुसावळ विभाग: ३.४२ लाख प्रकरणे – ३५.५२ कोटी रुपये

नागपूर विभाग: २.११ लाख प्रकरणे – १५.८३ कोटी रुपये

पुणे विभाग: १.८६ लाख प्रकरणे – १६.२९ कोटी रुपये

सोलापूर विभाग: ०.९५ लाख प्रकरणे – ६.१३ कोटी रुपये

मुख्यालय: ०.८८ लाख प्रकरणे – ८.५७ कोटी रुपये

ऑगस्ट महिन्याची विशेष कामगिरी – फक्त ऑगस्ट २०२६ या एका महिन्यात मध्य रेल्वेने २.५७ लाख प्रवाशांना पकडून १९.५० कोटी रुपयांचा दंड वसूल केला आहे. ऑगस्ट २०२५ मध्ये ही वसुली १३.७८ कोटी रुपये होती, म्हणजेच या एका महिन्यात दंड वसुलीत ४१ टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे.

विनातिकीट प्रवासासाठीचा किमान दंड २५० रुपयांवरून ५०० रुपये करण्यात आल्यापासून रेल्वे प्रशासनाने आपली पावले अधिक आक्रमक केली आहेत. मेल/एक्सप्रेस, पॅसेंजर, विशेष गाड्या तसेच मुंबई आणि पुणे विभागांतील उपनगरीय लोकल्समध्ये 'फोर्ट्रेस' तपासणी (प्रवेश आणि निर्गमन मार्गांवर कडक नजर), अचानक धाडी आणि मेगा तिकीट तपासणी मोहीम राबवली जात आहे.

रेल्वे कायद्यानुसार वैध तिकिटाशिवाय प्रवास करणे हा गुन्हा असून, यातून गोळा होणारा महसूल प्रवाशांच्या सुविधा, सुरक्षा आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वापरला जातो. विनातिकीट प्रवासाबाबत मध्य रेल्वेचे धोरण 'झिरो टॉलरन्स' (शून्य सहिष्णुता) असून, प्रवाशांनी योग्य आणि वैध तिकीट काढूनच सन्मानपूर्वक व जबाबदारीने प्रवास करावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# मुंबई कोस्टल रोडवर भरधाव बीएमडब्ल्यूचा भीषण अपघात! तिघांचा मृत्यू, १ जखमी

मुंबई : मुंबईच्या कोस्टल रोडवर रविवारी, २० सप्टेंबर रोजी पहाटे भरधाव इचथ कारचा भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत तिघांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. या अपघाताचा थरारक उउढत व्हिडिओ समोर आला असून, त्यामध्ये कार पुलाच्या कठड्याला धडकून हवेत उडत खाली कोसळताना दिसत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे सुमारे ५ वाजून २० मिनिटांच्या सुमारास ही दुर्घटना घडली. मरीन ड्राइव्हवरून हाजी अलीच्या दिशेने जाणारी इचथ कार लोटस जेट्टीजवळ, लाला लजपतराय महाविद्यालयासमोर आली असता चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याचा प्राथमिक अंदाज आहे. उउढत फुटेजमध्ये कार भरधाव वेगात जाताना, पुलाच्या बाहेरील कठड्याला धडकताना आणि त्यानंतर उंच पुलावरून खाली कोसळताना दिसते. खाली सुरू असलेल्या बांधकामाच्या परिसरात कार आदळली. या धडकेमुळे वाहनाचे मोठे नुकसान झाले. या इचथ कारमध्ये चार जण प्रवास करत होते. अपघातानंतर सर्वांना तातडीने नायर रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तिघांना मृत घोषित केले, तर चौथ्या तरुणावर गंभीर अवस्थेत उपचार सुरू आहेत. मृतांमध्ये २१ वर्षीय शानय गज्जल, १९ वर्षीय आदित्य जकासनिया आणि १७ वर्षीय धैर्य सेठ यांचा समावेश असल्याचे वृत्त आहे. जखमी तरुणाची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात आले आहे. हे तरुण अहमदाबादचे रहिवासी असून मुंबईत शिक्षण घेत होते, अशी माहिती समोर आली आहे.

प्राथमिक माहितीनुसार, भरधाव वेगामुळे चालकाचे नियंत्रण सुटल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र, अपघाताचे नेमके कारण अद्याप तपासाधीन आहे. पोलिसांकडून उउढत फुटेज आणि इतर पुराव्यांच्या आधारे पुढील तपास सुरू आहे.

# टाटा ग्रुपमधील वाद कोर्टात जाणार? टाटा ट्रस्टसने एन.चंद्रशेखरन यांची टाटा सन्समधील नियुक्ती फेटाळली





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: टाटा ट्रस्ट्सनं टाटा सन्सच्या बोर्डानं केलेली एन. चंद्रशेखरन यांची चेअरमनपदावरील फेर नियुक्ती फेटाळली आहे. टाटा सन्सच्या बोर्डाच्या बैठकीत झालेल्या ४-१ मतदानाला काही कायदेशीर अर्थ नाही कारण कंपनीच्या नियमानुसार चेअरमन नियुक्तीसाठी टाटा ट्रस्टनं नामनिर्देशित केलेल्या संचालकाची सहमती अनिवार्य आहे, जी पूर्ण झालेली नाही,अशी बाजू मांडण्यात आली आहे. टाटा सन्सच्या बोर्डानं एन. चंद्रशेखरन यांची पुढील ५ वर्षांच्या कार्यकाळासाठी चेअरमन पदावर निवड करण्याचा प्रस्ताव मंजूर केला होता. मात्र, टाटा सन्समधील सर्वाधिक भागधारक असलेल्या टाटा ट्रस्टनं हा निर्णय बेकायदेशीर असल्याचं म्हटलं. टाटा ट्रस्टनं रविवारी एक प्रसिद्धीपत्रक जारी केलं असून कंपनीच्या नियमानुसार टाटा ट्रस्टच्या नामनिर्देशित संचलाकांचा पाठिंबा कोणताही निर्णय घेण्यासाठी बोर्डाला दिलेला नाही असं म्हटलं आहे.

टाटा ट्रस्टसनं बोर्डाकडून देण्यात आलेला कास्टिंग वोस्टचा तर्क फेटाळून लावला आहे. जेव्हा नियम स्पष्ट आहे तेव्हा त्याला अडथळा म्हटलं जाऊ शकत नाही. टाटा ट्रस्टसच्या मते अध्यक्षांचं निर्णायक मत जेव्हा लागू होतं जेव्हा बोर्डात मतांची बरोबरी झालेली असते. हा नियम टाटा ट्रस्टसनं निवडलेल्या संचालकांवर लागू नसतो. मतदानाचा निकाल ४-१ असो की इतर अआकडे असो, हा निर्णय मान्य होत नाही, असं टाटा ट्रस्टसकडून सांगण्यात आलं.

टाटा ट्रस्टसनं प्रसिद्धीपत्रकात म्हटलं की टाटा सन्सच्या बोर्डात टाटा ट्रस्टसचे दोन संचालक आहेत. दोनचं बहुमत दोन होतं, एक नाही. एका संचालकानं प्रस्तावाविरोधात

(पान ४ वर..)

## गणरायाच्या जयघोषाने परिसर दुमदुमला

# पडघ्यात पाच दिवसांच्या गणरायाला भक्तीमय वातावरणात निरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधीइमिलिंद जाधव : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पडघा विभागात पाच दिवसांच्या गणरायाला रविवारी भक्तिमय आणि भावूक वातावरणात निरोप देण्यात आला. 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने पडघा परिसर दुमदुमून गेला. ढोल-ताशांचा गजर, गुलालाची उधळण आणि गणेशभक्तांचा उत्साह यामुळे विसर्जन मिरवणुकीला भक्तीमय रंग चढला होता.



पडघ्यात गणरायाचे मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार वातावरणात आगमन झाले होते. पाच दिवसांच्या उत्सवानंतर लाडक्या बाप्पाला निरोप देण्यासाठी नागरिक, गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि तरुणाई मोठ्या संख्येने सहभागी झाली होती. फुलांची आकर्षक सजावट, ढोल-ताशांचा निनाद आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात गणरायाची मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी पडघे येथिल वैश्य युवक गणेश उत्सव मंडळ व विद्यानगर युवक मंडळ यांच्या वतीने बसविण्यात आलेल्या गणरायाला भक्तीमय वातावरणात निरोप देण्यात आले.

पारंपरिक ढोल-ताशांच्या तालावर तरुणाईने उत्स्फूर्त सहभाग घेतला. मिरवणुकीदरम्यान गणेशभक्तांनी बाप्पाच्या चरणी श्रद्धा व्यक्त करत भावपूर्ण निरोप दिला. पडघ्यातील विविध सार्वजनिक मंडळांसह अनेक घरगुती गणरायांचेही भक्तिमय वातावरणात विसर्जन करण्यात आले.

८७ वर्षांची परंपरा कायम

पडघ्यातील वैश्य युवक गणेश उत्सव मंडळाने यंदाही ८७ वर्षांची गणेशोत्सवाची परंपरा कायम राखली. मंडळाच्या गणेशोत्सवाला पडघ्यात विशेष महत्त्व असून अनेक वर्षांपासून ही परंपरा उत्साहाने जपली जात आहे. गेल्या ३० वर्षांपासून समाजबांधवांकडून गणरायाची मूर्ती देण्यात येत आहे. गणेशमूर्ती देणाऱ्या व्यक्तीला गणेशोत्सवाच्या पहिल्या दिवशी आरती करण्याचा मान दिला जातो. या परंपरेमुळे गणेशोत्सवाशी समाजातील नागरिकांचे भावनिक नाते अधिक दृढ झाले आहे.

गणरायाच्या विसर्जनासाठी पडघा येथील लक्ष्मीनगर परिसरातील गणेश घाटावर पडघा ग्रामपंचायतीच्या वतीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रकाशव्यवस्था तसेच पाण्याची सुविधा करण्यात आली होती. विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि वाहतूक व कायदा-सुव्यवस्था सुरळीत राहावी यासाठी पडघा पोलीस ठाण्याच्या माध्यमातून विविध ठिकाणी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता .पाच दिवसांच्या गणेशोत्सवाची सांगता होत असताना भक्तांच्या डोळ्यांत बाप्पाला निरोप देण्याची भावूकता आणि पुढील वर्षी लवकर येण्याची आस दिसून येत होती. 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या!' या जयघोषाने पडघा परिसर भक्तिमय झाला.

# पंढरपूर तालुक्यातील भोसे येथील युवकाचा गोव्यात अपघाती मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील भोसे येथील उद्धव कोळी या युवकाची गोव्यात दुर्दैवी अपघाती निधन झाले. उद्धव आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता,



शुक्रवारी दिनांक १८ रोजी राज्यातील गोवा कुर्ती खंडेपार महामार्गावर केरे येथे कंटेनर आणि मोटरसायकलची भीषण धडक झाले व या अपघातात भोसे( करकंब) तालुका पंढरपूर येथील उद्धव बाळासाहेब कोळी (वय २५ )याचा जागीर मृत्यू झाला.

राजस्थान हून गोव्यातील होंडा येथे आलेल्या आरजे ०६ जीसी ९९ ८९ क्रमांकाचा कंटेनर केरी येथे अचानक नागरूत झाला. त्यामुळे तो महामार्गाच्या कडेला थांबवून दुरुस्तीचे काम सुरू होते दरम्यान महाराष्ट्रातून फोंड्याकडे भरधाव जाणाऱ्या एम एच बारा एफबी ५० १९ क्रमांकाची बुलेट मोटरसायकलची मागून कंटेनरला जोरदार धडक झाली, या धडकेत मोटरसायकल चालक उद्धव कुळे यांचा जागेत मृत्यू झाला तर अभिषेक धावरे गंभीर जखमी झाला व त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे व फोंडा पोलीस अधिक तपास करीत आहेत.

**उद्धव हा गावात अत्यंत प्रसिद्ध मनमिळाव युवक होता व नुकतेच त्याचे लग्न ठरले होते, व गोव्यात एका वैद्यकीय कंपनीत तो नोकरी करीत होता.**

**त्यांच्या ह्या अपघाती झाल्याने पंचक्रोशी मध्ये हाळ व्यक्त केली जात आहे.**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील मल्लिकार्जुन महादेव मंदिरासह प्राचीन मंदिरे स्थलांतरित न करता त्याच ठिकाणी त्याची संवर्धन व जतन करण्यात यावे

## विविध मागण्यांसाठी आजपासून करणार आमरण उपोषण; शासनाच्या निर्णयाकडे पंढरपूरकरांचे लक्ष



मागण्यावर काय निर्णय घेते याकडे पंढरपूरकरांचे लक्ष लागले आहे .

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर शहरातील प्रस्तावित क्वालिटीच्या विकास कामात श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील मल्लिकार्जुन महादेव मंदिरासह सर्व प्राचीन मंदिरे स्थलांतरित न करता, त्याच ठिकाणी त्याची संवर्धन व जतन करण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते सुनील आदरणीय लोकशाही मार्गाने आमरण उपोषणा- चा निर्णय घेतला आहे.

सोमवार दिनांक २१ सप्टेंबर २०२६ रोजी आमरण उपोषण सुरू करण्याचा येणार असल्याची त्यांनी प्रसिद्धी पत्रकातून सांगितले आहे.

सुनील अधटराव यांनी प्रशासन आणि राज्य शासनाकडे विविध म ागण्या केल्या आहेत.

या आहेत प्रमुख मागणी :-

मल्लिकार्जुन महादेव मंदिर, जखमी माता मंदिर आणि अकरा रुद्र मारुती मंदिर यांचे स्थलांतर करू नये.

मंदिराच्या जल्लोदाराची कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात यावीत.

प्रस्तावित कॉरिडॉरमुळे बाधित होणाऱ्या नागरिकांना योग्य आणि न्याय मोबदला देण्यात यावा.

एखाद्या कुटुंबाची संपूर्ण निवासी मालमत्ता बाधित झाल्यास आर्थिक उपलब्ध न करता त्यांना पर्यायी घर उपलब्ध करून देणे.

कॉरिडोर मुळे बाधित होणाऱ्या नगरपालिका शाळांचे अध्यक्ष यांचे पुनर्वसन करण्यात यावे.

बाधित नागरिकांची पुनर्वसन करून त्यांना नवीन घरी उपलब्ध करून देणे.

करून दिल्याशिवाय त्यांना त्यांच्या घरातून विस्थापित करू नये, अशी ही मागणी करण्यात आली आहे सुनील दत्तराव यांच्या मन्यानुसार पंढरपूरचा विकास होत असताना शहराचा प्राचीन धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा तसेच साम ान्य नागरिकांचे हित यांचा समतोल राखणे आवश्यक आहे.

मंदिराची जतन बाधित नागरिकांना न्याय आणि विकास कामाचे याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा या मागणीसाठी ही आमरण उपोषण करण्यात येत असल्याची त्यांनी स्पष्ट केले आहे.

आता प्रशासन आणि शासन या

---

## रक्तदान हेच खरे श्रेष्ठदान यासाठी सर्वांनी पुढे आले पाहिजे : नागेश गंगेकर




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : प्रतिवर्षीप्रमाणे गणेशोत्सव सर्वच मंडळ सामाजिक धार्मिक कार्यक्रमाने आनंद मध्ये व उत्साह मध्ये साजरा करतात त्यामध्ये नेहमीच सामाजिक कार्यामध्ये असणारे बालाजी युवक मंडळ काशी कपडे गल्ली ह्या मंडळांनी नुकतेच रक्तदान शिबिराचे आयोजन सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष श्री नागेश जी गंगेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी गंगेकर हे आपले मनोगत व्यक्त करत या रक्तदान शिबिरामध्ये अनेक मंडळातील कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी रक्तदान केले या मंडळातर्फे प्रत्येक वर्षी रक्तदान शिबिर रांगोळी स्पर्धा पैठणी साडी स्पर्धा लहान मुलांचे डान्स स्पर्धा आधी सांस्कृतिक सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन या मंडळाच्या वतीने सातत्याने केले जाते संरक्षणासाठी सीमेवर दिनरात डोळ्यात तेल घालून भारत मातेचे रक्षण केले जाते त्यामुळे आपण सुखी आ- होत पण सध्या राज्याला व देशाला रक्ताची फार गरज असून रक्तदान हे खरोखर श्रेष्ठ दान आहे आणि त्यासाठी सर्वांनी पुढे आले पाहिजे असे महत्त्वपूर्ण ऊदगार गंगेकर यांनी काढून मंडळाचे कौतुक करून आभार मानले हे शिबिर मंडळाचे सागर वाडेकर यांच्या म ार्गदर्शनाखाली घेण्यात आली असून एसीबी यशस्वी करण्यासाठी सुनील इंदापूरकर रॉक कुंदुर नरेश पिंगळे सुरेश गंगेकर विवेक गंगेकर अनिकेत वाडेकर अभिषेक वाडेकर ओमकार टमटम हैदर नाडीवाले साहिल भिंगारे ऊत सागर वाडेकर विकी गंगेकर अभिषेक टमटम लखन भिंगारे नाना वाडेकर साहेब वाघमारे स्वप्निल वाघमारे विनायक शेटे आधी मंडळाच्या कार्यकर्त्यांनी खूप परिश्रम घेतले.

---

## खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्यासह वरिष्ठ पदाधिकाऱ्यांकडे नागेश फाटे यांचा कार्यअहवाल सादर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापू सप्टेंबर : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षा- चे उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा उत्तर सोलापूर तालुका निरीक्षक नागेश एकनाथ फाटे यांनी उत्तर सोलापूर तालुका निरीक्षक म्हणून केलेल्या संघटनात्म क कामकाजाचा कार्यअहवाल माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्याकडे सादर केला.

उत्तर सोलापूर तालुका निरीक्षक म्हणून कार्यरत असताना तालुक्यातील पक्ष संघटन, पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी समन्वय, बैठका, संघटनात्मक उपक्रम, पक्षाच्या कार्यक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी तसेच आगामी काळातील संघटनात्मक वाटचालीसंदर्भातील नियोजन यांचा आढावा कार्यअहवालात मांडण्यात आला आहे.

सदर कार्यअहवाल पक्षाचे जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख आणि जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र पाटील यांच्याकडेही सादर करण्यात आला. यावेळी उत्तर सोला- पूर तालुक्यात पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यासाठी गावपातळीपर्यंत संघटनात्म क संपर्क वाढविणे, पदाधिकारी व कार्यकर्त्यांम ध्ये समन्वय राखणे तसेच आगामी काळातील संघटनात्मक उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली.

या प्रसंगी माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार अभिजीत पाटील, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख, जिल्हा कार्याध्यक्ष रवींद्र पाटील यांच्यासह पक्षाच्या विविध सेलचे जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यअहवाल सादरीकरणाच्या निमित्ताने उत्तर सोला- पूर तालुक्यातील संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेण्यात आला. आगामी काळात पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सम न्वयाने काम करण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

---




## चिमुकल्या विद्यार्थ्यांकडून गणपती विसर्जनातून पर्यावरण रक्षणाचा संदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : गणेशोत्सवात पर्यावरणपूरक उपक्रम राबवत जि. प. शाळा रायते वस्ती (खडक माळेगाव) ता. निफाड येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पंचपात्रीत श्री गणेशमूर्तीचे विसर्जन करून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश दिला.

शाळेच्या मुख्याध्यापिका संगिता कापसे, शिक्षक हर्षल पाटील यांनी प्लास्टर ऑफ पॅरिस च्या गणेश मुर्ती नदी पात्रात, तला- वात अथवा समुद्रात विसर्जन केल्याने होणारे जलप्रदूषण व त्यामुळे जलसृष्टीतील जीवांवर होणारे दुष्परिणाम यांची माहिती दिली. शाळेतील गणेशमुर्तीचे विद्यार्थ्यांनी पंचपात्रीत विधिवत ढोल वाजवत, नाचत गाणे गात विसर्जन करून 'उत्सवही साजरा करूया आणि पर्यावरणाचेही रक्षण करूया' हा संदेश सम ाजापर्यंत पोहोचला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक गणेशोत्सव- ात जलप्रदूषण टाळणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, ध्वनीप्रदूषण टाळा, धर्माकॉल चा वापर टाळा, डीजे चा वापर टाळा आणि नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करण्याबाबत जनजागृती केली. गणेशमूर्ती विसर्जनासाठी नदी, तलाव किंवा इतर जलस्रोतांचा वापर न करता घरच्या घरी अथवा शाळेच्या परिसरातच पर्यावरणपूरक पद्धती- ने विसर्जन करता येते, याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी करून दाखविले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांम ध्ये स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव निम ाण होण्यास मदत झाली. बालवयातच विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाची सवय करून देणा-या या उपक्रमाचे निफाड पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी विलास साळी, विस्तार अधिकारी, लता भरसट, कैलास बोरसे, नवनाथ सुडके, केंद्रप्रमुख विष्णू मोरे शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कावेरी रायते, माधुरी रायते, प्रमोद रायते, ज्ञानेश्वर रायते, सरला साळवे, संगिता रायते, म ाया गांगुर्डे, माधव रायते, ि सद्धार्थ भोसले,दिपक रायते पालक व ग्रामस्थ यांनी कौतुक केले.

---




## ग्रीन सिटी इंग्लिश मीडियम स्कूल वेळापूर विद्यार्थ्यांचे क्रीडा क्षेत्रात नेत्रदीपक यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या माध्यमातून शालेय तायकांडो स्पर्धेचे पिलेव येथे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेमध्ये संत सावतामाळी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ग्रीन सिटी इंग्लिश मीडियम स्कूल वेळापूरचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र गिरमे उर्फ रंजन भाऊ, सचिव, व सर्व संचालक मंडळ,मुख्याध्यापिका प्रतीक्षा भडके मॅडम व मुख्य क्रीडा प्रशिक्षक उद्धव जाधव सर यांनी यश संपादन केलेल्या मुलांचे स्वागत करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

यशश्री भगत. २२ ते२४ किलो वजन गटात तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक गोल्ड मेडल. वैष्णवी भगत २६ ते २९किलो वजन गट प्रथम क्रमांक गोल्ड मेडल. आदित्य कदम ३२ ते ३५ किलो वजन गट सिल्वर मेडल. तसेच मेघराज माने देशमुख सिल्वर मेडल यांनी द्वितीय क्रमांक यश संपादित केले. तालुका क्रीडा अधिकारी रणजीत लोहार हे उप- स्थित होते.

---

**सरफोजीराजे (द्वितीय) मराठी साहित्य संमेलनात संपूर्ण भारतातून जमणार साहित्यिकांचा मेळा**

**डॉ. शरद गोरेंच्या अध्यक्षतेखाली पार पडणार ऐतहासिक मराठी साहित्य संमेलन**

# तामिळनाडूतील तंजावर येथे २३ रोजी होणार दक्षिण भारतातील पहिलेच मराठी साहित्य संमेलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित सरफोजीराजे (द्वितीय) मराठी साहित्य संमेलन बुधवार (दि.२३) रोजी तंजावर येथे संपन्न होत आहे. तामिळनाडूतील तंजावर शहरात होणारे दक्षिण भारता- तील हे पहिलेच मराठी साहित्य संमेलन असून देशभरातून मराठी साहित्यिक उपस्थित राहण- ार आहेत. तंजावरच्या भूमीत होणाऱ्या संमेलनाच्या निमित्ताने मराठी – तमिळ भाषेला जोडत साहित्य, कला आणि संस्कृतीचा जागर होणार आहे. छ. शिवाजी महाराजांचे भाऊ व्यंकोजीराजे भोसले यांनी तंजावर येथे दक्षिणेतील मराठा साम्राज्याची स्थापना केली होती. त्यानंतर सरफोजीराजे भोसले (द्वितीय) यांनी तंजावर हे दक्षिणेतील मराठी संस्कृतीचे मुख्य केंद्र बनवले. सरफोजीराजेंनी साहित्यिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले असल्याने या संम ेलनाला सरफोजींचे नाव देण्यात आले आहे.

दि. २३ रोजी या संम ेलनाची सुरुवात दुपारी ३.३० वाजता ग्रंथ दिंडीने होणार आहे. श्रीमंत छत्रपती सरफोजीराजे भोसले स्मारक, कलादालन, राजमहाल परिसर येथून ही दिंडी निघेल. मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय विश्वस्त ज्ञानेश्वर पतंगे यांच्या हस्ते दिंडीचे पूजन होईल. यावेळी अश्विनी भगत, पल्लवीताई गोरे, सुधीर चव्हाण, रंजना भोईटे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

त्यानंतर दुपारी ४ वाजता तंजावर येथील बृहदेश्वर मंदिर- ाजवळील पेथनन कलैयरंगम सभागृह येथे या संमेलनाचे उद्घाटन तंजावर संस्थानचे प्रम ुख श्रीमंत छत्रपती बाबाजीराजे भोसले यांच्या हस्ते होईल. या ऐतहासिक संमेलनाचे संम ेलनाध्यक्षपद ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शरद गोरे हे भूषविणार आहेत. यावेळी निमंत्रक युवराज संभाजीराजे भोसले (प्रदेशाध्यक्ष, तामिळनाडू), म हाराष्ट्राचे माजी उच्चशिक्षण मंत्री व संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रा. डॉ. लक्ष्मणराव ढोबळे उपस्थित राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून अ.भा. म. साहित्य परिषदेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा शुभांगीताई काळभोर, कर्नाटक प्रदेशाध्यक्ष रवींद्र पाटील, उद्योजक आप्पासाहेब गुरव, कोल्हापूर विभागीय अध्यक्ष विकास भोसले आदींची उप- स्थिती असणार आहे.

उद्घाटन सत्रानंतर सायं. ६ वा. परिसंवाद होईल. सुप्रसिद्ध साहित्यिका प्रा. दीप्ती पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या परिसंवादात व्यंकट सोमाजी (आंध्रप्रदेश), विक्रम शिंदे (म हाराष्ट्र), अजय श्रीखंडे (दिल्ली), महादेव पवार (प. महाराष्ट्र) सहभागी होतील. सायं. ६.३० वा. सुप्रसिद्ध कवी रमेश रेडेकर (पुणे) यांच्या अध्यक्षेखाली कविसंमेलन होईल. यामध्ये अजय खडसे, अशोक थोरात, मीना महामुनी, सूर्यकांत नाम ुगडे, किशोर टिळेकर, सुवर्णा वाघमारे आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. यावेळी जेष्ठ साहित्यिक सूर्यकांत नामुगडे यांच्या सावल्या या काव्यसंग्रहाचे प्रकाशन उप- स्थित मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

> **तंजावर मधील या मराठी संमेलनासाठी दि, २१ रोजी फुलचंद नागटिळक यांच्या आयोजनाखाली शेकडो साहित्यिक आणि वारकऱ्यांना घेऊन पंढरीची वारी, साहित्य संमेलनाच्या दारी या उपक्रमांतर्गत पंढरपूर ते सोलापूर पायी ग्रंथदिंडी निघणार आहे. पुढे ही ग्रंथदिंडी सोलापूर येथून रेल्वेद्वारे संत साहित्याचा जागर करत तंजावर साहित्य संमेलनाच्या ठिकाणी पोहोचणार आहे. मुंबई, पुणे, सोलापूर मधून शेकडो मराठी साहित्यिक एकत्रित रेल्वेद्वारे संमेलनाला येणार असून धावत्या रेल्वेमध्ये विशेष प्रवासी साहित्ययात्री संमेलन रंगणार आहे. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या लिखित कवितांचे वाचनही होणार आहे. यातून मराठी लोककला, लोकसंस्कृती आणि अभिजात मराठीचा प्रचार प्रसार हाच मुख्य हेतू आहे**
>
> **– विक्रम मालन आप्पासो शिंदे**
> **प्रदेश सरचिटणीस, अ. भा. म. साहित्य परिषद,**
> **आयोजक – सरफोजीराजे (द्वितीय) मराठी साहित्य संमेलन,**
> **तंजावर.**

शिवसंत संजय म ोरे(बेळगाव), मुकेश सरद- ार चिखलदरा, प्रमोद काकडे(अमरावती), माणिक गोडसे(नाशिक), व्यं. कृ. पाटील(बेळगाव), पार्वती चव्हाण(खोपोली), भास्कर भोसले(पुणे), आरती सोनवणे(नाशिक), रामदास बिर्जे(चंदगड), अमोल कुंभार(पुणे), आप्पा फ ुले(अकलूज), जयश्री नांदे(पुणे), रवी चापके(पुसद), विजया पाटील(कराड), राजेंद्र फंड(शिर्डी), संगीता लंघे(पुणे) आदी संमेलनामध्ये सहभागी कवी असणार आहेत.

रात्री ८ वा. समारोप व पुरस्कार वितरण होईल. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे दिल्ली प्रदेशाध्यक्ष ड. प्रशांत चौधरी, तेलंगणा प्रदेशाध्यक्षा अनुराधा मारचट्टीवार, पंजाब प्रदेशाध्यक्षा पूनम सुल- ाने, हरियाणा प्रदेशाध्यक्ष विष्णू पाटील, गोवा प्रदेशाध्यक्षा छाया पुसेकर आदी या समारोपाला प्रम ुख पाहुणे उपस्थित राहतील.

या वेळी मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. यामध्ये आरती झोटिंग(सरफोजीराजे विशेष साहित्यरत्न पुरस्कार), डॉ. नंदकुमार राऊत(सरफोजीराजे युवा साहित्यरत्न पुरस्कार), गणेश आघाव(सरफोजीराजे कलारत्न पुरस्कार), फुलचंद नागटिळक( सरफोजीराजे समाजरत्न पुरस्कार), प्रार्थना फाउंडेशन(सरफोजीराजे उद्य- ोगत्न पुरस्कार), मानसिंग विष्णू जाधव( सरफोजीराजे शिक्षणरत्न जीवनगौरव पुरस्कार), पंडितराव लोहोकरे(सरफोजीराजे समाजरत्न जीवनगौरव पुरस्कार), बाळकृष्ण अमृतकर( सरफोजीराजे उद्य- ोगत्न पुरस्कार), अमोल पाटील(सरफोजीराजे समाजरत्न पुरस्कार), डॉ. आकाश वान- खेडे( सरफोजीराजे उद्योगत्न पुरस्कार), डॉ. तात्यासाहेब गायकवाड( सरफोजीराजे समाजरत्न पुरस्कार), रत्नप्रभा पाटील यांना पुरस्काराने गौरवण्यात येईल.

अधिक माहितीसाठी –
आयोजक टीम,
सरफोजीराजे (द्वितीय) म राठी साहित्य संमेलन, तंजावर.
७७४३८८४३०७

# निफाडमध्ये २ नोव्हेंबरला जिल्हा ग्रामीण मराठी साहित्य संमेलन

## न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या जन्मभूमीत साहित्यिकांचा मेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : स्वर्गीय वनाधिपती विनायकदादा पाटील प्रतिष्ठान, निफाड यांच्या वतीने न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या जन्मभूमी असलेल्या निफाड येथे २ नोव्हेंबर रोजी नाशिक जिल्हा ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनाच्या माध्यमातून निफाडच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक परंपरेला उजाळा देण्यासह जिल्ह्यात साहित्यविषयक वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष वि. दा. व्यवहारे यांनी दिली.

संमेलनाच्या नियोजनासाठी प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांची म हत्त्वपूर्ण बैठक नुकतीच वैनतेय विद्यालयाच्या सभागृहात झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी निफाडचे प्रथम नगराध्यक्ष राजाभाऊ शेलार होते. मराठी साहित्य परिषदेतर्फे आयोजित होत असलेल्या साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात साहित्यिक वातावरण ि न म ा ं ण व्हावे, यासाठी निफाड येथे संमेलन आयोजित करण्याबाबत बैठकीत सर्वसमावेशक चर्चा करण्यात आली. निफाडला या संमेलनासाठी विशेष ऐतिहासिक संदर्भ लाभला आहे. ११ मे १८७८ रोजी पुणे येथे झालेल्या पहिल्या मराठी ग्रंथकार संमेलनाचे अध्यक्षपद न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी भूषविले होते. या संमेलनाला पुढील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या परंपरेची गंगोत्री मानले जाते. त्या काळी 'मराठी ग्रंथकार संमेलन' या नावाने झालेल्या या उपक्रमाचा उद्देश मराठी भाषेतील ग्रंथनिर्मितीला प्रोत्साहन देणे, लेखक-वाचक यांच्यात संवाद वाढविणे आणि मराठी साहित्याच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे हा होता.या पहिल्या संमेलनाला उपलब्ध वृत्तसंदर्भानुसार सुमारे १५० लेखक उपस्थित होते. मराठी ग्रंथनिर्मिती, साहित्यविकास आणि विचारांची देवाणघेवाण याबाबत त्यावेळी चर्चा झाली होती. रानडे आणि लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांच्या पुढाकारातून ग्रंथनिर्मितीला चालना देणाऱ्या उपक्रमांनाही या काळात बळ मिळाले होते. तसेच या वेळी विनता नदीच्या स्वच्छता विषयी चर्चा करण्यात आली.

बैठकीत निफाड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे चेअरमन राजाभाऊ राठी, वि. दा. व्यवहारे, शिवाजीराजे ढेपले, श्री माणकेश्वर वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार, रतन पाटील वडघुले, सुभाष खाटेकर, राजेंद्र सोमवंशी आदींनी चर्चेत सहभाग घेतला. बैठकीचे सूत्रसंचालन मधुकर माळी यांनी केले, तर आभार सुभाष खाटेकर यांनी मानले.

यावेळी निफाड सोसायटीचे चेअरमन रमेश जाधव,मधुकर राऊत, पत्रकार दीपक श्रीवास्तव, संदीप चकोर, रामदास व्यवहारे, सागर निकाळे, मनीषा गुजराथी, राजेंद्र थोरात, आण्णासाहेब बोरगुडे, संतोष गिरी, तसेच पल्लवी सानप, सुनील चिखले,मालती वाघावकर, सीमा डेरले, बाळासाहेब गुंजाळ, मधुकर विसपुते यांच्यासह शहरातील नागरिक उपस्तितीत होते उपस्थित होते.



# सासवड -चंदनटेकडी बाह्य वळणावरील अपघात रोखण्यासाठी व उड्डाण पुलाच्या मागणीसाठी बेमुदत उपोषणाचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड :आळंदी पंढरपूर महामार्ग क्रमांक ९६५ वरील सासवड-चंदनटेकडी बाह्यवळण मार्गावर उड्डाण पूल उभारण्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने २८ सप्टेंबरपासून बेमुदत उपोषण करण्यात येणार आहे. वारंवार होणारे अपघात रोखण्यासाठी हा निर्णय घेतल्याची माहिती पक्षाचे पुरंदर तालुकाध्यक्ष बळीराम सोनवणे व कार्याध्यक्ष कालिदास उबाळे यांनी दिली.



सासवड-चंदनटेकडी बाह्यवळण हे ठिकाण सध्या अपघातांचे केंद्र बनले असून, येथे आतापर्यंत अनेक निष्पाप नागरिकांना प्राण गमवावे लागले आहेत. भविष्यातील जीवितहानी टाळण्यासाठी या ठिकाणी तातडीने उड्डाण पूल होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद केले आहे. या मागणीसाठी रिपब्लिकन पक्षाचे पुरंदर तालुका अध्यक्ष बळीराम सोनवणे व

पुरंदर तालुका कार्याध्यक्ष कालिदास उबाळे आंदोलनाचे नेतृत्व करणार आहेत.

या मागणीसंदर्भात आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप, सासवड पोलिस ठाणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना निवेदने देण्यात आली आहेत.

# शेतकऱ्याच्या डोळ्यांसमोर जळतंय वर्षभराचं पीक!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : सिंदखेड राजा तालुक्यातील हिवरखेड पूर्णा, पिंपळगाव सोनारा आणि बाळसमुद्र येथे शेतकरी योद्धा कृती समितीने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन सोयाबीन पिकाची प्रत्यक्ष पाहणी केली.

हिवरखेड पूर्णा येथे शेतकरी संदीप चव्हाण यांच्या शेतातील सोयाबीन मोठ्या प्रमाणात वाळलेले असून, शेंगांमध्ये दाणे अपूर्ण व अत्यंत बारीक असल्याचे दिसून आले. यावेळी भाजपा प्रदेश प्रवक्ते विनोदजी वाघ यांनीही शेतकऱ्यांच्या बांधावर उपस्थित राहून पाहणी केली.

पिंपळगाव सोनारा आणि बाळसमुद्र येथेही शेतकऱ्यांनी वाळलेले सोयाबीन उपटून प्रत्यक्ष परिस्थिती दाखवली. वर्षभर जपलेले पीक हातातून जात असल्याच्या वेदनेतून काही शेतकऱ्यांनी सोयाबीनला आग लावून आपली व्यथा व्यक्त केली.



शेतकऱ्याने स्वतःचं पीक जाळण्याची वेळ आली आहे, आता सरकारला आणखी कोणता पुरावा हवा? असा सवाल शेतकरी योद्धा कृती समितीने उपस्थित केला.

शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी उद्या सिंदखेड राजा तहसील कार्यालयात मुख्यमंत्री व कृषिमंत्र्यांच्या नावे निवेदन देण्यात येणार आहे.

शेतकरी योद्धा कृती समितीचे संस्थापक अध्यक्ष बालाजी सोसे, प्रदेश अध्यक्ष गजानन जायभाय, उपप्रदेश अध्यक्ष रघुनाथजी आघाव, भाजपा किसान मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाषजी मुंडे, समिती सदस्य गजाननजी मुंडे यांच्यासह शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.



# चोराखळी येथे बालाजीभाऊ गायकवाड यांच्या हस्ते गणरायाची महाआरती संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील चोराखळी येथील विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या वतीने आयोजित गणेशोत्सवात लहुजी शक्ती सेनेचे प्रदेश महासचिव बालाजीभाऊ गायकवाड यांच्या हस्ते श्री गणरायाची महाआरती मोठ्या भक्तिभावात संपन्न झाली.

यावेळी बालाजीभाऊ गायकवाड यांनी श्रींचे मनोभावे दर्शन घेतले व उपस्थित सर्व गणेश भक्तांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. गणेशोत्सव हा एकतेचा आणि सामाजिक बांधिलकीचा सण असून या उत्सवातून सामाजिक एकोपा वाढीस लागतो, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी विघ्नहर्ता गणेश मंडळाचे अध्यक्ष अक्षय कसबे, उपाध्यक्ष वैभव डोंगरे, शंकरभाऊ ताटे, सामाजिक कार्यकर्ते दत्ताभाऊ खुणे, करण डोंगरे, बापूराव डोंगरे, विवेक डोंगरे, अर्जुन डोंगरे, समीर डोंगरे, यश कसबे, कुणाल पेठे, खंडू पेठे, किशोर डोंगरे, प्रशांत खुणे, यश खंडागळे यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समाज बांधव व मोठ्या संख्येने गणेश भक्त उपस्थित होते.

# टाटा ग्रुपमधील वाद कोर्टात जाणार? टाटा ट्रस्टसने एन.चंद्रशेखरन यांची टाटा सन्समधील नियुक्ती फेटाळली

(पान १ वरून..) मतदान केलं. यामुळं असोसिएशनच्या नियमानुसार टाटा ट्रस्टसच्या संचालकाचं सकारात्मक समर्थन चंद्रशेखरन यांच्या नियुक्तीला मिळालेलं नाही. टाटा ग्रुपमध्ये सुरु असलेली अंतर्गत वर्चस्वाची लढाई आता कोर्टात पोहचू शकते. टाटा ट्रस्टसनं ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांना कायदेशीर सल्लागार म्हणून नियुक्त केलं आहे. हा वाद सहमतीनं सुटू न शकणं ही दुःखाची बाब आहे. सिंघवी यांनी रतन टाटा यांच्यासोबतच्या संबंधांना उजाळाला दिला. अभिषेक मनु सिंघवी यांनी टाटा ट्रस्ट आणि टाटा सन्स यांच्यात १०० वर्षांहून अधिक जुनं नातं आहे. यांना वेगळं करण्याचा विचार करु शकत नाही. ट्रस्टनं निर्णय घेणे, मतदानात एकमत न होणे, नेहमीच्या नियमाकडे दुर्लक्ष करणे आणि वेटोच्या नियमांकडे दुर्लक्ष करणे चुकीचं आहे, असं सिंघवी यांनी म्हटलं.

## पुण्यातील 'फार्मोत्सव २०२६' या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात केला गौरव

# स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीला 'बेस्ट कॉलेज अवार्ड'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पुण्यातील नॅशनल फार्मसी वेलफेअर असोसिएशन, इंडिया यांच्या वतीने आयोजिलेल्या 'फार्मोत्सव २०२६' या राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीला 'आदर्श फार्मसी शिक्षण पदवी संस्था' म्हणून गौरविण्यात आले, त्याबद्दल स्वेरीच्या फार्मसी महाविद्यालयाचे सर्वत्र कौतुक होत आहे.




राष्ट्रीय फार्मसी वेल्फेअर असोसिएशन ही महाराष्ट्रातील फार्मासिस्ट, प्राध्यापक, विद्यार्थी आणि फार्मसी महाविद्यालयांना एकत्र आणणारी अग्रगण्य संस्था आहे. या संस्थेच्या माध्यमातून करिअर मार्गदर्शन, जॉब फेअर, संशोधन उपक्रम, वर्ल्ड फार्मासिस्ट डे आणि राज्यस्तरीय शैक्षणिक कार्यक्रमांचे सातत्याने आयोजन केले जाते. संपूर्ण महाराष्ट्रातील विविध फार्मसी महाविद्यालये एनपीडब्ल्यूएच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रियपणे सहभागी आहेत. 'फार्मोत्सव २०२६' हा एनपीडब्ल्यूएच्या सहकार्याने राष्ट्रीय फार्मसी शिक्षण दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेला राज्यस्तरीय उपक्रम होता. दि.१२ सप्टेंबर २०२६ रोजी पुणे येथे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यात अकॅडेमिया, फार्मा उद्योग आणि नियामक क्षेत्रातील तज्ज्ञांनी संशोधन, नवोपक्रम आणि रोजगाराच्या संधींवर मार्गदर्शन केले. एनपीडब्ल्यूएच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांमध्ये अध्यक्ष डॉ. सचिन कोतवाल, उपाध्यक्ष डॉ. अमोल शाह, सचिव डॉ. संपत नवले, संयुक्त सचिव प्रा. प्रविण जावळे आणि कोषाध्यक्ष डॉ. नरहरी पाटील यांचा समावेश आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली एनपीडब्ल्यूए ही संस्था महाराष्ट्रातील फार्मसी शिक्षण आणि फार्मासिस्ट कल्याणासाठी सातत्याने कार्यरत आहे. या राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान समारंभामध्ये नॅशनल फार्मसी वेलफ ेअर असोसिएशनच्या वतीने 'फार्मोत्सव २०२६' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्तविक असोसिएशनचे कार्यकारी अध्यक्ष प्रविण जावळे यांनी केले. अध्यक्ष डॉ.सचिन कोतवाल यांनी असोसिएशनच्या वतीने सर्व उपस्थितांचे स्वागत केले. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी यावेळी भारती विद्यापीठाच्या प्रांगणात होणाऱ्या या समारंभ प्रसंगी भारती विद्यापीठाचे संस्थापक कुलपती डॉ. पतंगराव कदम यांच्या बरोबरीने मिळालेल्या अनेक वर्ष सहव ासाची अनुभूती सांगितली तसेच फार्मसी क्षेत्रातील अनेक प्रश्नांवर एकत्र येण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी नॅशनल फार्मसी वेलफेअर असोसिएशनच्या तज्ञ समिती सदस्यासोबत लवकरच बैठक आयोजित करून सर्व गोष्टींचा आढावा घेऊन सदर बाब महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडण्याची भूमिका विशद केली. आरोग्य क्षेत्रामध्ये फार्मासिस्ट हा केवळ मेडिकल दुकानापुरता मर्यादित नसून तो औषध निर्मात्यापासून संशोधक ते उद्योजक या व्यापक स्वरूपात महत्वपूर्ण कार्य करतो. भारतीय शिक्षण व्यवस्था आणि त्यामधील कांही महत्त्वपूर्ण बदल याविषयी देखील त्यांनी आपले विचार मांडले. गुणवंत विद्यार्थी व फार्मसी क्षेत्रामध्ये योगदान देणाऱ्या पुरस्कार प्राप्त अनेक मान्यवरांचे देखील त्यांनी यावेळी अभिनंदन केले. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य मा.विजय पाटील यांनी देखील गुणवंत विद्यार्थी व शिक्षक यांचे विशेष अभिनंदन केले. यावेळी तंत्रशिक्षण स ं च ा ल न ा ल य पुणे विभाग सहसंचालक डॉ. सुरेश पाटील यांनी देखील फार्मसीमध्ये हा उपक्रम निश्चितच नाविन्यपूर्ण आहे व नवीन मुलांना नवीन नेतृत्व घडवण्याची प्रेरणा देणारा आहे असे सांगितले. स्वेरी तथा श्री विठ्ठल एज्युकेशन ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूटचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस)चे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांनी यावेळी फार्मसी शिक्षण व्यवस्थेमध्ये होऊ घातलेले नाविन्यपूर्ण बदल याविषयी भाष्य केले. याप्रसंगी असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. अमोल शहा, सचिव डॉ. संपत नवले, सहसचिव व मुख्य समन्वयक डॉ. प्रफुल्ल आडकर पाटील, खजिनदार डॉ. नरहरी पाटील, सदस्य डॉ. स्वामी जी. एम.,कार्यक्रमाच्या संयोजिका डॉ. निर्मल कासेकर, मुख्य सल्लागार डॉ. व्ही.एन.जगताप व प्रा. पोपट जाधव इ. मान्यवर उपस्थित होते.

**या भरगच्च महोत्सवात फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाचे विजय पाटील म्हणाले की, 'पुढील 'फार्मोत्सव २०२७' ला आपण पंढरपूर मधील स्वेरीच्या डॉ. बी.पी. रोंगे सरांना आमदार म्हणून बोलवायचे आहे, त्यासाठी पाठिंबा देत आहे. यावर उपस्थितांनी टाळ्यांनी प्रतिसाद देत डॉ. बी.पी. रोंगे सरांना यंदाच्या निवडणुकीत सहकार्य करण्यासाठी हिरवा कंदील दाखविला.**

स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीला 'बेस्ट कॉलेज अवार्ड' मिळाल्यामुळे संस्थेचे संस्थापक डॉ. बी. पी. रोंगे, अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, स्वेरी कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. एस.व्ही.मांडवे, स्वेरी लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ.बनकर, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पदवीच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इतर अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी स्वेरीज् कॉलेज ऑफ फार्मसीच्या संपूर्ण स्टाफचे अभिनंदन केले आहे. या 'फार्मोत्सव २०२६' मध्ये श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटच्या कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूरला 'बेस्ट इन्स्टिट्यूट अवॉर्ड २०२६' घोषित करण्यात आला. सन २००६ मध्ये स्थापन झालेल्या स्वेरीज कॉलेज ऑफ फार्मसी, पंढरपूरने फार्मसी शिक्षणासोबतच संशोधन आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. सोलापूर विद्यापीठ (आताचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ) मान्यताप्राप्त असलेल्या या महाविद्यालयाने स्थापनेपासून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा जपली आहे. महाविद्यालयात २००६ मध्ये बी. फार्मसी हा अभ्यासक्रम सुरू झाला त्यानंतर २०१० मध्ये एम. फार्मसी या अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आली आणि २०१६ मध्ये पीएच.डी. संशोधन केंद्राला मान्यता मिळाल्याने संशोधनाला नवे बळ प्राप्त झाले. आज हे महाविद्यालय पदवी, पदव्युत्तर आणि डॉक्टरेट स्तरावरील शिक्षण व संशोधनासाठी एक सक्षम केंद्र म्हणून विकसित झाले आहे. संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंत महाविद्यालयाच्या प्राध्यापक व संशोधकांनी २४ पेटंट प्रकाशित केली असून १०० हून अधिक संशोधन निबंध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशित केले आहेत. याशिवाय संशोधन क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल घेत विविध शासकीय संस्थांकडून संशोधन प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे. त्यासाठी सुमारे ४५ लाख रुपयांचा संशोधन निधी उपलब्ध झाला आहे.